# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.10.2025** **वार- शुक्रवार**

---

**धनधान्य**

प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेचा प्रारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या दिल्लीत होणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये या योजनेची घोषणा करण्यात आली होती. या योजनेचा राज्यातील मुख्य कार्यक्रम कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात होईल; यात ३००हून अधिक प्रयोगशील शेतकरी सहभागी होणार आहेत.

**संमेलन**

पुण्यात बालगंधर्व रंगमंदिर इथं येत्या १९ ऑक्टोबर रोजी पहिल्या आरोग्य साहित्य संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. साहित्यिक डॉ. संजय ओक यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनाचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे, प्रसिद्ध गायक-संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी, चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले आदी यावेळी उपस्थित राहणार आहेत. या निमित्ताने पुणे आरोग्य महोत्सवाचेही आयोजन केले आहे. आरोग्य महोत्सवामध्ये २५ हजार ते ४० हजार रुग्णांची आरोग्य तपासणी करण्याचे उद्दिष्ट आहे. .

**सिरप**

मध्यप्रदेशातील खोकल्याच्या औषधाने दगावलेल्या औषधाचे वितरण पुण्यात झालेले नसल्याने नागरिकांनी काळजी करण्याचे कारण नसून खोकल्याच्या इतर कंपन्यांच्या औषधाचे नमुने खबरदारी म्हणून घेण्यात येत असल्याची माहिती पुणे विभागाच्या अन्न आणि औषध प्रशासनाने दिली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या ‘एफडीए’ने सर्व जिल्ह्यांना खोकल्याच्या औषधांची तपासणी करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार पुणे विभागातही नमुने घेण्याची प्रक्रिया सुरू झाली असल्याचं एफडीए पुणे विभागाचे सहआयुक्त गिरीश हुकरे यांनी सांगितले.

**भूसंपादन**

पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी जमीन मोजणीचे काम गतीने सुरू असून, सद्यःस्थितीत तीन गावांची मोजणी पूर्ण झाली आहे. दोन गावांची मोजणी अंतिम टप्प्यात आली आहे. १६ ऑक्टोबरपर्यंत सातही गावांची मोजणी पूर्ण करण्यात येणार आहे. मोजणी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या ; मोबदल्यासह इतर मागण्या ऐकून घेतल्या जाणार आहेत. त्यानंतर २० नोव्हेंबरपासून भूसंपादनाचा प्रत्यक्ष मोबदला शेतकऱ्यांना देण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

**संकलन**

पुणे महापालिकेकडून येत्या उद्यापासून १३ ऑक्टोबरपर्यंत निरुपयोगी वस्तूंच्या संकलनाचे महाअभियान राबविण्यात येणार आहे. सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या अंतर्गत प्रत्येक प्रभागात ई-कचरा आणि प्लास्टिक कचरा संकलित करण्यात येणार आहे. पेहेल उपक्रमांतर्गत जनवाणी, कमिन्स इंडिया फाउंडेशन, के.पी.आय.टी. टेक्नॉलॉजी आणि आदर पूनावाला क्लीन सिटी इनिशिएटिव्ह या संस्थाही या मोहिमेत सहभागी होणार आहेत. त्यांच्या माध्यमातून १२ ऑक्टोबर रोजी ई-कचरा आणि प्लास्टिक कचरा संकलन मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांनी दिली.

**भुयार**

पुणे शहरातील आरटीओ चौक आणि मंगळवार पेठेतील शाहीर अमर शेख चौक या दरम्यान असणाऱ्या अरुंद रेल्वे भुयारी मार्गाचे रुंदीकरण करण्याचा निर्णय पुणे महापालिकेने घेतला आहे. या ठिकाणचा अभ्यास करून त्याचा अहवाल सादर करण्यासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सुरु केली आहे.

**वीज**

पिंपरी चिंचवड महापालिकेने कचऱ्याचे व्यवस्थापन आणि पुनर्वापर करून मोशी कचरा डेपो इथं 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प उभारला आहे. या ठिकाणी कचऱ्यापासून १४ मेगावॅट क्षमतेची वीज निर्मिती केली जात आहे. ऑगस्ट २०२५ पर्यंत या प्रकल्पाद्वारे ३ लाख ४१ हजार १११ मेट्रिक टन कचऱ्यापासून तयार इंधन वापरून १६ कोटी ६६ लाख ३६ हजार ७५० युनिट्स वीज निर्मिती करण्यात आली आहे. यापैकी, प्रकल्प संचालनासाठी आवश्यक वीज खर्च वगळता १५ कोटी ५७ लाख ४० हजार १९८ युनिट्स वीज महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या ग्रीडमध्ये पुरवण्यात आली आहे.

**नियुक्ती**

'महा-मेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार स्वीकारला आहे. मावळते आयुक्त शेखर सिंह यांची नियुक्ती नाशिक कुंभमेळा आयुक्त म्हणून नुकतीच झाली आहे. हर्डीकर यांनी मेट्रोने महापालिकेत प्रवेश करत शहराच्या सार्वजनिक वाहतुकीवरील विश्वास दाखवून दिला.

**निवडणूक**

महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेची निवडणूक दोन नोव्हेंबर रोजी पुण्यात होणार आहे. संघटनेचे विद्यमान अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही अध्यक्ष पदासाठी अर्ज भरला आहे. 2013 सालापासून सलग तीन वेळा अजित पवार अध्यक्ष पदावर आहेत. महासचिव पदासाठी नामदेव शिरगावकर खजिनदार पदासाठी चंद्रकांत जाधव यांनीही अर्ज दाखल केले आहेत. अर्ज भरण्याची उद्याची अखेरची मुदत असल्याचं संघटनेनं म्हटलं आहे.

**<u>अभ्यासक्रम</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागात नव्या शैक्षणिक अभ्यासक्रमांना आजपासून सुरुवात करण्यात आली आहे. आपत्ती व्यवस्थापन आणि राष्ट्रीय सुरक्षा ,सायबर आणि भारताची राष्ट्रीय सुरक्षा, छत्रपती शिवाजी महाराजांची राष्ट्रनिर्मितीची दृष्टी ,छत्रपती शिवाजी महाराजांची राष्ट्रनिर्मितीची दृष्टी या विषयातील अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

पोलिस-श्रद्धा पुणे पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने केलेल्या कारवाईत १७ लाख रुपयांचे अमली पदार्थ तसच तंबाखू जन्य पदार्थ जप्त केले आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल 32 तर किमान १९ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. आकाश निरभ्र होते.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**